# १. सारांश

## १.१ प्रस्तावना

दी टाटा पॉवर कंपनी लिमिटेड ही कंपनी सन १९१९ मध्ये प्रस्थापित झाली. दी टाटा हायड्रो–इलेक्ट्रिक पॉवर सप्लाय कंपनी लिमिटेड (सन १९१० मध्ये प्रस्थापित) आणि दी आंध्रा व्हॅली पॉवर सप्लाय कंपनी लिमिटेड (सन १९१६ मध्ये प्रस्थापित) या कंपन्या एप्रिल १, २००० रोजी एकच कंपनी म्हणून टाटा पॉवरमध्ये विलीन करण्यात आल्या. या विलीनीकरणाचा परिणाम म्हणून वर उल्लेखिलेल्या कंपन्यांचे परवानेही विलीन झाले आणि महाराष्ट्र राज्य सरकारतर्फे दिनांक १२ जुलै २००१ च्या संमत ठराव क्र. आयईए–२००१ / सीआर–१०५०९ / एनआरजी-१, अन्वये टीपीसीला मुंबई परवाना क्षेत्रातील नागरिकांना आणि घाऊक प्रमाणात वीज वितरण परवानाधारकांना वीज पुरवण्याचा परवाना देण्यात आला. सन्माननीय आयोगाने टाटा पॉवर-टीला इलेक्ट्रिसिटी ॲक्ट २००३ अंतर्गत पारेषण परवानाधारक म्हणून मान्यता दिली आहे.

या दस्तऐवजामध्ये (आ.व.२००८-०९ करिता) टाटा पॉवर-टीच्या पारेषण व्यवसायाबाबतच्या ॲन्युअल पर्‌फॉर्मन्स रिव्ह्यू आणि ॲन्युअल रेव्हेन्यू रिक्वायरमेंटचा तपशील आहे व त्यात (१) आ.व.२००७-०८ मदील कामगिरीचा सत्य-पडताळा, (२) आ.व.२००८-०९ च्या कामगिरीचे पुनरावलोकन आणि (३) आ.व.२००९-१० संदर्भात प्रक्षेपित कामगिरीचा समावेश आहे.

## १.२ या विनंती अर्जासंदर्भातील सर्वसाधारण पध्दत

या विनंती अर्जासंदर्भात अवलंबिलेल्या सर्वसाधारण पध्दतीतील महत्वाचे मुद्दे पुढे दिले आहेत :

### १.२.१ आ.व. २००७-०८ साठी सत्य-पडताळा

आपल्या पारेषण व्यवसायाबद्दलच्या विविध कामगिऱ्यांविषयी आणि खर्चाशी संबंधित निकषांबाबतच्या आ.व.२००७-०८मधील प्रत्यक्ष कामगिरीबाबतचा हा अर्ज टाटा पॉवर-टी सादर करत आहे. तसेच रिटर्न ऑन इक्विटी, वर्किंग कॅपिटलवरील व्याज यासारख्या घटकांचा हिशोब सन्माननीय आयोगाने विविध नियमने आणि आदेशांद्वारे मान्यता दिलेल्या नॉर्मेटिव्ह तत्वांवर आधारित असेल.

### १.२.२ आ.व.२००८-०९ करिता ॲन्युअल पर्‌फॉर्मन्स रिव्ह्यू अर्ज आणि आ.व.२००९-१० करिता सुधारित अंदाजपत्र

माननीय आयोगाच्या निर्देशनानुसार, आ.व.२००८-०९ करिता टाटा पॉवर-टी आपल्या वीज पारेषण व्यवासायासंदर्भातील या वर्षाच्या (आ.व.२००८-०९) पहिल्या सहामाहीमधील प्रत्यक्ष कामगिरीवर आणि दुसऱ्या सहामाहीच्या पुनर्रचित अंदाजावर आधारित असलेला ॲन्युअल पर्‌फॉर्मन्स रिव्ह्यू अर्ज सादर करीत आहे. तसेच गेल्या वर्षाच्या कामगिरीवर आधारित असलेले आ.व.२००९-१० साठीचे आपले पुनर्रचित अंदाजपत्रक टाटा पॉवर-टी सादर करीत आहे.

### १.२.३ वीज दर प्रस्ताव

२७ जून २००६ व २९ सप्टेंबर २००६ च्या महाराष्ट्र राज्यासाठीच्या पारेषण दर-चौकटीबाबतच्या आदेशांद्वारे सन्माननीय आयोगाने असे निर्देशित केले आहे, की इन्ट्रा-स्टेट ट्रान्समिशन सिस्टिम (इन-एसटीएस) म्हणजेच राज्यांतर्गतच्या पारेषण व्यवस्थेच्या वापरासाठी लागू होणारे पारेषणाचे टेरिफ, पूल्ड कॉस्ट्सच्या आधारे महाराष्ट्रातील संयुक्त पारेषण व्यवस्थेच्या वापराबाबतच्या दराचा हिशोब करुन पारेषण व्यवस्थेचा वापर करणाऱ्या विविध उपभोक्त्यांच्या (टीएसयुज्) ‘को-इन्सिडन्ट पीक डिमांड’ (सीपीडी) मधील हिश्शाच्या प्रमाणात प्रत्येकाकडून वसुली करण्याचा समावेश असलेल्या बहुवर्षीय टेरिफसंदर्भातील आदेशास अनुसरुन असेल.

आ.व.२००८-०९ करिता सादर असलेल्या या अर्जात टाटा पॉवर–टीच्या या वर्षाच्या सुधारित वार्षिक महसूल आवश्यकतेचा तपशील आहे. परंतू, “संयुक्त पध्दत“ आधारभूत मानून संपूर्ण राज्यासाठीचा पारेषण दर निश्चित केला जाणार असल्यामुळे टाटा पॉवर-टीतर्फे पारेषण व्यवसायासाठी कोणताही पारेषण-दर–प्रस्ताव सादर केलेला नाही.

### १.२.४ या विनंती अर्जासंदर्भातील सर्वसाधारण पध्दत

हा सादर होत असलेला ॲन्युअल परफॉर्मन्स रिव्ह्यू आणि वीज दर प्रस्ताव सन्माननीय आयोगाने नियमनात उल्लेख केलेल्या तत्वांवर आणि संदर्भित टेरिफ ऑर्डर्स (आ.व.२००६-०७साठीचा वीज-दर आदेश, आ.व.२००७-०८ ते आ.व.२००९-१० या काळासाठीचा बहुवर्षीय वीज दर आदेश आणि आ.व.२००७-०८ साठीचा ॲन्युअल परफॉर्मन्स रिव्ह्यु) यावर आधारित आहे. तसेच टाटा पॉवर–टीने एमईआरसीच्या दिनांक ३ ऑक्टोबर २००६च्या वीज-दर आदेशाविरुध्द आणि ३ ऑक्टोबर २००६च्या वीज-दर आदेशावरील रिव्ह्यू पिटीशनवरील दिनांक २२ मार्च २००७ च्या आदेशाविरुध्द सन्माननीय ॲपेलेट ट्रिब्यूनलकडे मे २००७ मध्ये अपील दाखल केले होते. सन्माननीय ॲपेलेट ट्रिब्यूनल फॉर इलेक्ट्रिसिटी (एटीई) ने १२ मे २००८ रोजी या अपीलावरील आपला निर्णय जारी केला व त्यात केलेल्या मार्गदर्शनानुसार संदर्भित एआरआर सुधारण्याचे आणि त्याच्या होणाऱ्या परिणामांचा समावेश सत्य-पडताळ्यादरम्यान करण्याचे आदेश सन्माननीय आयोगास दिले. टाटा पॉवर-टीने एटीईच्या निर्णयाचा टाटा पॉवर–टीवर होणारा परिणाम आणि आ.व.२००८-०९ साठीच्या एपीआर अर्जाद्वारे त्याची करावयाची वसुली यासंदर्भात प्रस्ताव सादर करावा असे सन्माननीय आयोगाने एपीआरसंदर्भातील आपल्या २६ मे २००८ च्या आदेशाच्या परिच्छेद १.३ द्वारे नमूद केले आहे. त्यानुसार, एटीईच्या निर्णयाचा परिणाम आणि वसुलीच्या प्रस्तावित पध्दतीचा समावेश टाटा पॉवर–टीने आ.व.२००८-०९च्या एपीआर अर्जात केला आहे.

## १.३ आ.व.२००७-०८ मधील कामगिरी

खालील भागांमधे कामकाज व देखभाल खर्चाच्या विविध घटकांसंदर्भातील प्रत्यक्ष कामगिरी स्पष्ट केली आहे :

### १.३.१ कामकाज व देखभाल खर्च

खालील भागांमधे कामकाज व देखभाल खर्चाच्या विविध घटकांबाबतची प्रत्यक्ष कामगिरी स्पष्ट केली आहेः

#### १.३.१.१ कर्मचारीसंबंधित खर्च

सन्माननीय आयोगाने मान्यता दिलेल्या रु.६० कोटीच्या तुलनेत आ.व.२००७-०८ करिता कर्मचारीसंबंधित खर्च रु.५५ कोटी इतका आहे. व्यावसायिक आणि कुशल व्यक्तींकरिता व्यवसायक्षेत्रात असलेल्या वाढत्या मागणीमुळे कर्मचारी नोकऱ्या सोडून जाण्याच्या वाढत्या प्रमाणामुळे आ.व.२००७-०८ मध्ये कर्मचारीसंबंधित खर्चात घट झाली आहे. तसेच कर्मचारी निवृत्त होण्यामुळे रिक्त झालेल्या पदांवर नेमणुका अद्याप झालेल्या नसल्यामुळे कर्मचारीसंबंदित खर्चात आणखी रु.२ कोटी इतकी घट झाली आहे.

नवीन पारेषण प्रकल्पाकरिता लागणाऱ्या मनुष्यबळाची गरज भागवण्यासाठी नव्या कर्मचाऱ्यांची भरती करण्यात येणार असल्यामुळे आ.व.२००८-०९ आणि आ.व.२००९-१० मध्ये कर्मचारीसंबंधित खर्चात वाढ होईल याची नोंद घ्यावी अशी नम्र विनंती सन्माननीय आयोगास टाटा पॉवर-टी करत आहे.

#### १.३.१.२ व्यवस्थापन आणि सर्वसाधारण खर्च

सन्माननीय आयोगाच्या मान्यतेनुसार आ.व.२००७-०८ मधील व्यवस्थापन आणि सर्वसाधारण खर्च रु.२६ कोटी आहे. ब्रँड इक्विटीसंदर्भात परवानगी नाकारलेल्या खर्चाचा विचार करता हा व्यवस्थापन आणि सर्वसाधारण खर्च जवळजवळ सन्माननीय

आयोगाच्या मान्यतेइतकाच आहे. टाटा पॉवर-टीने सन्माननीय आयोगाने ब्रँड इक्विटीसंदर्भातील खर्चाबाबत परवानगी नाकारण्याच्या स्वीकारलेल्या धोरणाविरुध्द एटीईकडे अपील केले असल्याने, एटीईतर्फे टाटा पॉवरला अनुकूल निकाल प्राप्त झाल्यास त्यानुसार वसुली करण्याचा दावा करण्याचा आपला हक्क टाटा पॉवर-टी राखून ठेवत आहे.

### १.३.१.३ दुरुस्ती आणि देखभाल

सन्माननीय आयोगाने मान्यता दिलेल्या रु.१२ कोटीच्या तुलनेत दुरुस्ती व देखभाल खर्च रु.९ कोटी इतका आहे. प्रामुख्याने पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध नसल्यामुळे काही नियोजित खर्चाच्या बाबी पुढे ढकलाव्या लागल्याने दुरुस्ती आणि देखभाल खर्चातील घट झाली आहे. पुढे ढकलाव्या लागलेल्या खर्चाच्या बाबी आ.व.२००८-०९ आणि आ.व.२००९-१० मध्ये अमलात आणाव्या लागतील.

### १.३.१.४ एकूण कामकाज व देखभाल खर्च

सन्माननीय आयोगाने आ.व.२००७-०८ करिता सत्य-पडताळा करताना मान्यता दिलेल्या रु.९८ कोटीच्या तुलनेत कामकाज व देखभाल खर्च रु.९१ कोटी इतका असून त्यामधून ब्रँड इक्विटी आणि ब्रँड प्रमोशनचा खर्च वगळण्यात आला आहे. एटीईतर्फे टाटा पॉवरला अनुकूल निकाल प्राप्त झाल्यास त्यानुसार वसुली करण्याचा दावा करण्याचा आपला हक्क टाटा पॉवर-टी राखून ठेवत आहे.

सन्माननीय आयोगाने मान्यता देलेल्या रकमेपेक्षा एकूण कामकाज व देखभाल खर्चाची रक्कम कमी असल्याने त्यास मान्यता देण्याची सन्माननीय आयोगास नम्र विनंती आहे.

### १.३.२ भांडवली खर्च

सन्माननीय आयोगाने आ.व.२००७-०८ करिता मान्यता दिलेल्या रु.१२९ कोटीच्या तुलनेत भांडवली खर्च रु.६२ कोटी इतका आहे. त्याचप्रमाणे आ.व.२००७-०८ मधील प्रत्यक्ष भांडवलीकरण सन्माननीय आयोगाने मान्यता दिलेल्या रु.९४ कोटीच्या तुलनेत रु.५१ कोटी इतके आहे. आ.व.२००७-०८ मधील प्रत्यक्ष भांडवली खर्च आणि भांडवलीकरणाचा सारांश खाली दिल्याप्रमाणे आहे :

**तक्ता १-१: आ.व. २००७-०८ – प्रत्यक्ष भांडवली खर्च**

| तपशील | आ.व. २००७ - ०८ | | | |
|---|---|---|---|---|
| | आयोगाची मान्यता | प्रत्यक्ष # | आयोगाची मान्यता | प्रत्यक्ष |
| | भांडवली खर्च | | भांडवलीकरण | |
| सध्याच्या योजना (पुढे चालू असलेल्या योजना) | | | | |
| नॉन-डीपीआर योजना | | १२ | | १६ |
| डीपीआर योजना | | ३५ | | २६ |
| **एकूण पुढे चालू असलेल्या योजना** | - | **४७** | - | **४२** |
| | | | | |
| नव्या योजना | | | | |
| नॉन-डीपीआर योजना | | ११ | | ७ |
| डीपीआर योजना | | ३ | - | ० |
| **एकूण नव्या योजना** | - | **१३** | - | **७** |
| | | | | |
| वैकल्पिक तरतुदीसह एचओ आणि एसएसचे विभाजन | | २ | | २ |
| | | | | |
| **एकूण पारेषण** | **१२९** | **६२** | **९४** | **५१** |

**# आयडीसीसहित**

### १.३.३ कर्जावरील व्याज

गत वर्षांच्या नॉर्मेटिव्ह लोन्सवरील (आ.व.२००३-०४ करिता भांडवली खर्चाच्या ७० % आणि आ.व.२००४-०५ व आ.व.२००५-०६ करिता भांडवलीकरणाच्या ७० %) व्याजाव्यतिरिक्त आ.व.२००८-०९ करिता व्याज आणि फायनान्स चार्जेसचा हिशोब आ.व.२००६-०७ आणि आ.व.२००७-०८ दरम्यान भांडवलीकरण करण्यात येत असलेल्या भांडवली खर्चाच्या ७०% खर्चाच्या आधारे केला आहे. आपल्या भांडवली खर्चासाठी टाटा पॉवरने आयडीएफसीकडून रु.४५० कोटीचे कर्ज खालील अटींवर घेतले आहे :

---

| | | |
|---|---|---|
| मुदत | : | ३ वर्ष परतफेड विलंबन अधिकार + ९ वर्षे |
| परतफेड | : | रु.५.६५ कोटीचे ३५ तिमाही हप्ते आणि ३६ वा हप्ता रु.२५२.२५ कोटींचा, या स्वरुपात परतफेड |
| व्याज दर | : | बेंचमार्क दर (५ वर्ष जी–सेक दर) + १.४५% प्रतिवर्ष (दरमहा देय) (किमान ८.९०% च्या मर्यादेत) |

---

वरील मुद्यांचा विचार करुन आ.व.२००७-०८ करिता व्याजदर ८.९% गृहीत धरला आहे, आणि आ.व.२००७-०८ करिता व्याजापोटीच्या रकमेचा हिशोब सन्माननीय आयोगाने मान्यता दिलेल्या रु.६ कोटीच्या तुलनेत रु.४.८३ कोटी इतका येत आहे. मान्यताप्राप्त पातळीपेक्षा कमी प्रमाणात भांडवलीकरण झाल्यामुळे व्याजापोटीचा खर्च कमी आला आहे.

### १.३.४ वर्किंग कॅपिटलवरील व्याज

सन्माननीय आयोगाने आ.व.२००७-०८ करिता मान्यता दिलेल्या रु.५ कोटीच्या तुलनेत ११.५% दराने टाटा पॉवर–टीचे वर्किंग कॅपिटलवरील व्याज रु.५ कोटी इतके आहे.

टाटा पॉवर–टीच्या वर्किंग कॅपिटलसाठी लागणाऱ्या प्रत्यक्ष रकमांची तरतूद प्रत्यक्ष कर्जे आणि इंटर्नल ॲक्रुअल्सच्या मिश्रणाच्या माध्यमातून कॉर्पोरेटने पुरवलेल्या रकमांद्वारे केली आहे. परंतु टाटा पॉवर–टीने आपल्या वर्किंग कॅपिटलच्या गरजांसाठी सर्व व्यवसायांवर एकत्रितपणे घेतलेल्या लघु मुदतीच्या कर्जाद्वारे आर्थिक बळ उभे केले आहे. अशा लघु मुदतीच्या कर्जासाठी टाटा पॉवरने दिलेल्या व्याजाची रक्कम रु.२५.९२ कोटी येते. टाटा पॉवरच्या व्यवसायातील नॉर्मेटिव्ह वर्किंग कॅपिटलमधील टाटा पॉवर–टीच्या हिश्शाच्या प्रमाणात काढलेला या रकमेचा टाटा पॉवर–टीचा हिस्सा रु.१ कोटी येतो.

उर्वरित गरजेसाठी कॉर्पोरेट फंडाच्या (इंटर्नल ॲक्रुअल्स) माध्यमातून अर्थव्यवस्था केली आहे. (इंटर्नल ॲक्रुअल्ससारख्या) कॉर्पोरेट फंडांच्या माध्यमातून उभ्या केलेल्या आर्थिक मदतीमुळे ही रोख रक्कम पैसा-बाजारात गुंतवून त्यावर उत्पन्न कमावण्याची संधी नाकारली जात असल्याने कॉर्पोरेटला अशा स्वरुपाच्या ‘इंटर्नल कॅश’ किंवा रकमांवर ती त्या स्वरुपात राखण्याचा खर्च (कॅरीइंग कॉस्ट) येतो त्यामुळे व्याज लागू करण्यासाठी अशा स्वरुपात पुरवलेली आर्थिक मदतदेखील पात्र ठरते याची कृपया नोंद घेणे आवश्यक आहे.

टेरिफ नियमनांमध्येदेखील वर्किंग कॅपिटलवरील व्याजाचा हिशोब ‘नॉर्मेटिव्ह बेसिस’वर करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले असून वर्किंग कॅपिटलसाठीची आर्थिक व्यवस्था प्रत्यक्ष कर्जातूनच उभारली जावी अशा प्रकारची कोणतीही पूर्व-अट नियमनांमध्ये घालण्यात किंवा निर्देशिण्यात आलेली नाही हे इथे आम्ही नमूद करतो. तसेच भांडवली खर्चासाठी घेण्यात येणाऱ्या नॉर्मेटिव्ह कर्जांसाठी लागू केली जाणारी पध्दतच वर्किंग कॅपिटलसाठी आर्थिक तरतूद करण्याच्या बाबतीतही लागू केली जावी अशी आम्ही विनंती करतो.

वरील मुद्दे विचारात घेऊन, वर्किंग कॅपिटलच्या प्रत्यक्ष आवश्यक रकमेवरील नॉर्मेटिव्ह व्याजदराने (एसबीआय पीएलआर) येणाऱ्या व्याजाच्या रकमेचा समावेश फायदा आणि तोट्याचा हिशोब करताना वर्किंग कॅपिटलवरील व्याजापोटीच्या खर्चात करण्यात यावा अशी आम्ही विनंती करतो. २६ मे २००८ रोजी दिलेल्या टेरिफ आदेशात स्वीकारलेल्या आपल्या पूर्वीच्या धोरणाचा सन्माननीय आयोगाने पुन्हा विचार करावा आणि वर्किंग कॅपिटलमुळे बदल होणाऱ्या फायदा आणि तोट्याचा हिशोब करण्यासाठी वरील पध्दतीस मान्यता देण्याची टाटा पॉवर–टी सन्माननीय आयोगास नम्र विनंती करत आहे.

वरील पध्दतीनुसार आ.व.२००७-०८ करिता हिशोब केलेले टाटा पॉवर–टीचे वर्किंग कॅपिटल रु.२ कोटी येते.

### १.३.५ इतर फायनान्स चार्जेस

मान्यताप्राप्त इतर फायनान्शियल चार्जेसच्या रु.०.०२ कोटीच्या तुलनेत हा अर्ज सादर करतेवेळी सन्माननीय आयोगाने आपल्या आदेशात मान्यता दिल्यानुसार रु.(०.१९) कोटी इतके उत्पन्न आले आहे.

### १.३.६ अवमूल्यन

आ.व.२००७-०८ चे अवमूल्यन रु.२७ कोटी असून ते सन्माननीय आयोगाच्या मान्यताप्राप्त पातळीवरच राखलेले आहे. परंतु सन्माननीय आयोगाने आपल्या पूर्वीच्या आदेशात स्वीकारलेल्या तत्वांना अनुसरुनच अवमूल्यनाचा हिशोब करण्यात आला असला तरी टाटा पॉवर–टीने त्याविरुध्द एटीईकडे अपील केले आहे असे टाटा पॉवर–टी नम्रपणे नमूद करु इच्छिते.

### १.३.७ इक्विटीवरील परतावा

भांडवलीकृत खर्च आणि डेटःइक्विटीची ७०:३० अशी प्रमाणपध्दत याच्या आधारे आलेली इक्विटी आणि त्यावरील १४ % परताव्याची आ.व. २००७-०८ साठीची रक्कम परताव्याच्या मान्यताप्राप्त रु.५९ कोटींच्या तुलनेत रु.५८ कोटी इतकी आहे. या वर्षादरम्यान कमी प्रमाणात झालेल्या मालमत्तेच्या भांडवलीकरणामुळे मान्यताप्राप्त मर्यादेच्या तुलनेत इक्विटी भांडवलावरील प्रत्यक्ष परताव्याचे प्रमाण कमी आहे.

### १.३.८ आयकर

सन २००७ मधील दावा क्र.६४, ६५ आणि ६६च्या संदर्भात सन्माननीय आयोगाचे आदेश असे आहेत :

> " कर्जावरील तसेच वर्किंग कॅपिटलवरील नॉर्मेटिव्ह व्याज हे प्रत्यक्ष खर्च नाहीत आणि म्हणूनच, आयकराचा हिशोब करताना अशा स्वरुपाचे खर्च करपात्र उत्पन्नातून वजा करण्यास पात्र ठरत नाहीत, या आरईएलच्या दाव्याशी आयोग सहमत आहे. "

कराच्या रकमांचा हिशोब करताना टाटा पॉवर–टीने या आदेशांचा विचार अनुस्यूत केला आहे. याच निर्णयाच्या आणि आयकर कायद्याच्या विविध कलमांमधील तरतुदींच्या आधारे टाटा पॉवर–टीने आपली आ.व.२००७-०८ करिता हिशोब केलेली कराची रक्कम सन्माननीय आयोगाने मान्यता दिलेल्या रु.३३ कोटीच्या तुलनेत रु.३७ कोटी इतकी येते.

### १.३.९ स्टॅट्युटरी ॲप्रोप्रिएशन्स

सन्माननीय आयोगाने आ.व.२००७-०८ करिता मान्यता दिलेल्या रु.५.२३ कोटीच्या तुलनेत स्टॅट्युटरी ॲप्रोप्रिएशनची आ.व.२००७-०८ ची रक्कम रु.२ कोटी येते.

### १.३.१० नॉन-टेरिफ इन्कम

आ.व.२००७-०८ करिता टाटा पॉवर–टीचा नॉन-टेरिफ इन्कम मान्यताप्राप्त उत्पन्नमर्यादेपेक्षा जास्त असून तो रु.१३ कोटी आहे. या नॉन-टेरिफ इन्कममधे पुनरावर्ती उत्पन्नाच्या रु.६ कोटी आणि पुनरावर्ती नसलेल्या उत्पन्नाच्या रु.७ कोटींचा समावेश आहे.

### १.३.११ पारेषण उपलब्धतेवरील इन्सेन्टिव्ह

टाटा पॉवर–टीच्या पारेषण व्यवस्थेच्या उपलब्धतेच्या आधारे हिशोब केलेला देय इन्सेन्टिव्ह रु.३ कोटी इतका येतो.

### १.३.१२ आ.व.२००७-०८ करिता वार्षिक पारेषण चार्जेस

वर उल्लेख केलेल्या विविध खर्चाच्या बाबींच्या आधारे, टाटा पॉवर–टीची आ.व.२००७-०८ साठीची प्रत्यक्ष कामगिरीवर आधारलेली वार्षिक महसूल आवश्यकता खालीलप्रमाणे आहे :

**तक्ता १-२: आ.व.२००७-०८ करिता वार्षिक महसूल आवश्यकता**

रु. कोटीमधे

| तपशील | आयोगाची मान्यता | आ.व. २००७-०८ (प्रत्यक्ष) | फरक |
|---|---|---|---|
| कामकाज व देखभाल खर्च | ९८ | ९१ | (८) |
| दीर्घ मुदतीच्या कर्जावरील व्याज | ६ | ५ | (१) |
| वर्किंग कॅपिटलवरील व्याज | ५ | ५ | ० |
| इतर फायनान्स चार्जेस | ० | (०) | (०) |
| अवमूल्यन | २७ | २७ | ० |
| आयकर | ३३ | ३७ | ४ |
| स्टॅट्युटरी ॲप्रोप्रिएशन्स | ५ | २ | (३) |
| भांडवलावरील परतावा | ५९ | ५८ | (१) |
| वार्षिक पारेषण चार्जेस | २३४ | २२५ | (९) |
| इन्सेन्टिव्ह | | ३ | ३ |
| **एकूण पारेषण चार्जेस** | **२३४** | **२२८** | **(६)** |
| वजा : नॉन-टेरिफ इन्कम | ९ | १३ | ४ |
| **वसुलीपात्र नक्त महसूल** | **२२५** | **२१५** | **(१०)** |

### १.३.१३ आ.व.२००७-०८च्या फायदा व तोट्याचे विभाजन

सन्माननीय आयोगाने सुचविलेल्या पध्दतीच्या आधारे खर्चाची विविध सदरे (१) नियंत्रण करणे शक्य असलेला खर्च आणि (२) नियंत्रण करणे शक्य नसलेला खर्च अशा मुख्य दोन प्रकारात विभाजित केली आहेत.

अशी विभागणी केल्यानंतर, नियंत्रण करणे शक्य असलेल्या सदरांसंदर्भातील फायदा आणि तोट्याचा हिशोब करण्यात आला आहे.

#### १.३.१३.१ कामकाज व देखभाल खर्चातील फायदा व तोटा

फायदा / तोट्याचा हिशोब तसेच नियंत्रण करणे शक्य असलेल्या खर्चामुळे प्राप्त होणारा हक्क खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे आहेः

**तक्ता १-३: आ.व.२००७-०८ – कामकाज व देखभाल खर्चातील बदलानुसार झालेला फायदा आणि तोटा**

| अनुक्र. | तपशील | रु. कोटीमधे |
|---|---|---|
| १ | आ.व.२००७-०८चा मान्यताप्राप्त कामकाज व देखभाल खर्च | ९८ |
| २ | ब्रँड इक्विटी वगळून प्रत्यक्ष कामकाज व देखभाल खर्च | ९१ |
| ३ | नियंत्रण करणे शक्य नसलेला खर्च | |
| ४ | नियंत्रण करणे शक्य नसलेल्या खर्चाव्यतिरिक्तचा प्रत्यक्ष खर्च (२ – ३) | ९१ |
| ५ | - वितरण परवानाधारकांना हस्तांतरित केलेली रक्कम (फायदा/तोट्याचा १/३ हिस्सा) (१/३ * (१)-(४)) | ३ |
| ६ | टाटा पॉवर–जीने राखून ठेवण्यास परवानगी देण्यात आलेली रक्कम (फायदा/तोट्याचा १/३ हिस्सा) (१/३ × (१) – (४)) | ३ |
| ७ | नक्त पात्रता (३) + (४) + ((२/३ × (१-४)) | ९६ |

### १.३.१३.२ वर्किंग कॅपिटलवरील व्याजामुळे झालेले फायदे व तोटे

भाग १.३.४ आणि ४.४.२ मधे नमूद केलेल्या कारणांच्या आधारे, खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार वर्किंग कॅपिटलवरील व्याजामुळे होणाऱ्या फायदा व तोट्याचा विचार करण्याची नम्र विनंती टाटा पॉवर-टी सन्माननीय आयोगास करत आहे.

**तक्ता १-४ः वर्किंग कॅपिटलवरील व्याजामुळे झालेले फायदे व तोटे**

| अनुक्र. | तपशील | रु. कोटीमधे |
|---|---|---|
| १ | मान्यताप्राप्त नॉर्म्सनुसार वर्किंग कॅपिटलवरील नॉर्मेटिव्ह व्याज | ५ |
| २ | वर्किंग कॅपिटलवरील प्रत्यक्ष व्याज | २ |
| ३ | नियंत्रण करणे शक्य नसलेला खर्च | ० |
| **४** | **नियंत्रण करणे शक्य नसलेल्या खर्चाव्यतिरिक्तचा प्रत्यक्ष खर्च (२ – ३)** | **२** |
| ५ | - वितरण परवानाधारकांना हस्तांतरित केलेली रक्कम (फायदा/तोट्याचा १/३ हिस्सा) (१/३ * (१)-(४)) | १ |
| ६ | टाटा पॉवर–जीने राखून ठेवण्यास परवानगी देण्यात आलेली रक्कम (फायदा/तोट्याचा १/३ हिस्सा) (१/३ × (१) – (४)) | १ |
| **७** | **नक्त पात्रता (३) + (४) + ((२/३ × (१-४))** | **४** |

### १.३.१४ पारेषण व्यवसायातून आलेला महसूल

सन्माननीय आयोगाने २ एप्रिल २००७ च्या बहुवर्षीय टेरिफ आदेशाद्वारे मान्यता दिल्यानुसार पारेषण व्यवसायातून आलेला महसूल रु.२१२ कोटी इतका होता.

### १.३.१५ आ.व.२००७-०८ करिता नक्त वार्षिक पारेषण चार्जेस आणि फरक

फायदा आणि तोट्याच्या विभाजनासह आ.व.२००७-०८ करिता खर्चाचा तपशील सारांशरुपाने खालीलप्रमाणे आहेः

तक्ता १-५: आ.व.२००७-०८ - नक्त वार्षिक पारेषण चार्जेस आणि फरक

| | | आ.व २००७-०८ | | | |
|---|---|---|---|---|---|
| अनुक्र. | तपशील | मान्यताप्राप्त | नियमनानुसार पात्रता | नियंत्रण करणे शक्य असलेल्या घटकांद्वारे आलेले इफिशियन्सी गेन्स/लॉस | नियंत्रण करणे शक्य असलेल्या घटकांद्वारे आलेल्या इफिशियन्सी गेन्स/लॉसच्या जुळवणीनंतरची (रिझर्वज्मधे केलेल्या जमेसह) नक्त पात्रता |
| एक | महसूल | | | | २२४ |
| | - पारेषण चार्जेस | | | | २१२ |
| | - इतर इन्कम | | | | १३ |
| दोन | खर्च | | | | |
| | | | | | |
| १ | कामकाज व देखभाल खर्च | ९८ | ९८ | ३ | ९६ |
| २ | अवमूल्यनासंदर्भातील अग्रिम हप्त्यासह अवमूल्यन, | २७ | २७ | | २७ |
| ३ | दीर्घ मुदतीच्या कर्ज भांडवलावरील व्याज | ६ | ५ | | ५ |
| ४ | वर्किंग कॅपिटलवरील व्याज | ५ | ५ | १ | ४ |
| ५ | इतर फायनान्स चार्जेस | ० | (०) | | (०) |
| ६ | इन्सेन्टिव्ह | - | ३ | - | ३ |
| ७ | स्टॅट्युटरी अप्रोप्रिएशन्स / वैकल्पिक राखीव | ५ | २ | | २ |
| ८ | आयकर | ३३ | ३७ | | ३७ |
| ९ | इक्विटीवरील परतावा | ५९ | ५८ | | ५८ |
| १० | **एकूण खर्च** | **२३४** | **२३६** | **४** | **२३२** |
| | | | | | |
| तीन | **फरक / (फायदा)** | | | | ८ |

टाटा पॉवर–टी वर उल्लेख केलेल्या आ.व. २००७-०८मधील खर्च, महसूल आणि फरक/फायद्यास मान्यता देण्याची नम्र विनंती सन्माननीय आयोगास करत आहे.

### १.४ आ.व.२००८-०९ ची कामगिरी

या भागात आ.व.२००८-०९ मधील कामगिरीबद्दल माहिती दिली असून त्यामधे आ.व.२००७-०८ करिता टाटा पॉवर–टीने सादर केलेला एआरआर, माननीय आयोगाचा २६ मे २००८ चा एपीआर आदेश, आ.व.२००८-०९च्या पहिल्या सहामाहीमधील (एप्रिल २००८ ते सप्टेंबर २००८) प्रत्यक्ष कामगिरी आणि दुसऱ्या सहामाहीच्या (ऑक्टोबर २००८ ते मार्च २००९) अंदाजित कामगिरी यांचा विचार केला आहे.

### १.५ महसूल

सन्माननीय आयोगाच्या आदेशाच्या आधारे टाटा पॉवर–टीने राज्याच्या पारेषण कंपनीला (बहुवर्षीय टॅरिफ आदेशाद्वारे आ.व.२००७-०८ करिता मान्यता दिलेल्या रु.२११.७२ कोटी रकमेचा विचार करुन) दरमहा रु.१७.६४ कोटीप्रमाणे दोन महिन्यांसाठी आणि (एपीआर आदेशाद्वारे आ.व.२००८-०९ करिता मान्यता दिलेल्या रु.२११.७२ कोटी रकमेचा विचार

करुन) दरमहा रु.२०.६९ कोटीप्रमाणे वर्षाच्या उर्वरित काळासाठी आकार लावला आहे. त्यामुळे आ.व.२००८-०९ करिता एकूण महसुलाची अंदाजित रक्कमा रु.२४२ कोटी येते.

### १.६ भांडवली खर्च

आ.व.२००७-०८ करिता सादर केलेल्या एपीआरमध्ये दर्शविलेल्या प्रक्षेपित अंदाजाच्या मान्यताप्राप्त रु.३३२ कोटी रकमेच्या तुलनेत आ.व.२००८-०९ करिता भांडवली खर्चाची रक्कम आता रु.३४० कोटी इतकी होण्याची अपेक्षा आहे. तसेच सन्माननीय आयोगाने मान्यता दिलेल्या रु.१२३ कोटीच्या तुलनेत या वर्षादरम्यान रु.१७५ कोटी इतके भांडवलीकरण करण्याचा प्रस्ताव आहे. सुधारित भांडवली खर्च आणि प्रस्तावित भांडवलीकरणाचा सारांश खालीलप्रमाणे आहेः

**तक्ता १-६: आ.व.२००८-०९ सुधारित भांडवली खर्चाचा सारांश**

| तपशील | आ.व.२००८-०९ | | | |
|---|---|---|---|---|
| | आयोगाची मान्यता | सुधारित अंदाज # | आयोगाची मान्यता | सुधारित अंदाज |
| | भांडवली खर्च | | भांडवलीकरण | |
| **सध्याच्या योजना (पुढे चालू असलेल्या योजना)** | | | | |
| नॉन-डीपीआर योजना | १९ | ३५ | ३० | ३० |
| डीपीआर योजना | २७२ | १२५ | ६४ | १०१ |
| **एकूण पुढे चालू असलेल्या योजना** | **२९१** | **१६०** | **९५** | **१३०** |
| | | | | |
| **नव्या योजना** | | | | |
| नॉन-डीपीआर योजना | २५ | २७ | २२ | १७ |
| डीपीआर योजना | ११ | १४८ | - | २३ |
| **एकूण नव्या योजना** | **३६** | **१७५** | **२२** | **४०** |
| | | | | |
| वैकल्पिक राखीवसहित एचओ व एसएस विभाजन | ६ | ५ | ६ | ५ |
| | | | | |
| एकूण पारेषण चार्जेस | ३३२ | ३४० | १२३ | १७५ |

**# आयडीसीसह**

### १.७ टाटा पॉवर–टी करिता वार्षिक महसूल आवश्यकता

भांडवलाची किंमत व त्याच्या परिणामामुळे येणारा भांडवली खर्च, इक्विटीचा घटक आणि नॉर्मेटिव्ह कर्ज यांच्या आधारे टाटा पॉवर-टीचे वार्षिक फिक्स्ड चार्जेस त्या संदर्भातील टेरिफ नियमनांनुसार निश्चित केले आहेत.

नॉन-टेरिफ इन्कम व लोड कंट्रोल सेंटरची टाटा पॉवर–जी आणि टाटा पॉवर–डीवर टाटा पॉवर-टीकरिता नक्त एआरआर निश्चित करण्यासाठी विभाजित केलेली किंमत या सगळ्याच्या नक्त परिणामाच्या स्वरुपात वरील वार्षिक महसूल आवश्यकता काढलेली आहे.

#### १.७.१ कामकाज व देखभाल खर्च

कामकाज व देखभाल खर्चाच्या विविध घटकांसंदर्भातील सुधारित अंदाजित कामगिरी पुढील भागांमधे स्पष्ट केली आहेः

**१.७.१.१ कर्मचारीसंबंधित खर्च**

सन्माननीय आयोगाने मान्यता देलेल्या रु.५६ कोटीच्या तुलनेत आ.व.२००८-०९ करिता कर्मचारीसंबंधित खर्च रु.६० कोटी इतका अंदाजिला आहे. तसेच टाटा पॉवर-टीने आ.व.२००७-०८ च्या एपीआर अर्जामध्ये सादर केलेला सुधारित अंदाज रु.६० कोटी होता.

केलेल्या अंदाजित तरतुदीपेक्षा प्रत्यक्षात सेवानिवृत्तीसंदर्भात द्यावयाच्या फायद्यांबाबत आलेला जास्तीचा प्रत्यक्ष खर्च हे प्रामुख्याने टेरिफ आदेशामध्ये मान्यता दिलेल्या रकमेपेक्षा कर्मचारीसंबंधित खर्च जास्त येण्याचे कारण आहे. तसेच गेल्या वर्षापासूनच्या रिक्त पदांवर नेमणुका करण्याचे काम प्रगतीपथावर असल्याने कर्मचारी संख्येत वाढ होण्याची अपेक्षा आहे. त्याशिवाय आगामी काळातील पारेषण प्रकल्पांसाठी आणखी नेमणुका करण्याचे कामही प्रगतीपथावर आहे. त्यामुळे वेतन आणि मनुष्यबळासंबंधीच्या खर्चात वाढ होईल अशी अपेक्षा आहे.

सन्माननीय आयोगाने  मान्यता दिलेल्या (आ.व.२००७-०८ करिता रु.६० कोटी) रकमेइतकाच आ.व.२००८-०९ करिता या सदराखालील अंदाजित खर्च आहे याची कृपया नोंद घ्यावी. वर उल्लेख केलेल्या कारणांनुसार सन्माननीय आयोगाने कर्मचारीसंबंधित खर्चातील वाढीस मान्यता देण्याचा विचार करावा आणि या अंदाजित रकमेस मान्यता द्यावी अशी नम्र विनंती आहे.

**१.७.१.२ व्यवस्थापन व सर्वसाधारण खर्चः**

सन्माननीय आयोगाने मान्यता दिलेल्या रु.२७ कोटीच्या तुलनेत आ.व. २००८-०९ करिता व्यवस्थापन व सर्वसाधारण खर्च रु.२९ कोटी (ब्रँड इक्विटी वगळून) इतका अंदाजिला आहे. तसेच आ.व.२००७-०८ साठीच्या एपीआर अर्जात टाटा पॉवर–टीने रु.३१ कोटीचा सुधारित अंदाज सादर केला होता. आ.व.२००८-०९ साठीच्या टेरिफ आदेशाच्या तुलनेत येणारा हा फरक एमबीपीटीतर्फे वे लीव्ह रेट्समधे केले जाणारी वाढ, सुरक्षा सेवांच्या दरातील वाढीमुळे या बाबतीतला वाढलेला खर्च तसेच चोऱ्यांना प्रतिबंध करण्याच्या उपायांसाठी योजलेले वाढीव सुरक्षा उपाय, विम्याच्या खर्चातील वाढ, गेल्या वर्षी तरतूद न केलेली एएस-१५ नुसार 'राईट ऑफ' साठीची तरतूद आणि वैकल्पिकतेसाठीची तरतूद यासारख्या विविध नियंत्रण करणे शक्य असलेल्या / नसलेल्या घटकांमुळे आला आहे. नियंत्रण करणे शक्य नसलेल्या घटकांचा सन्माननीय आयोगाने मान्यता दिलेल्या खर्चाच्या रकमेसह विचार केल्यानंतर जी रक्कम येईल, त्या रकमेच्या मर्यादेत या अर्जात अंदाजिलेला खर्च येईल.

**१.७.१.३  दुरुस्ती व देखभाल खर्च**

दुरुस्ती आणि देखभालीचा एकूण खर्च  रु.१२ कोटी अंदाजित आहे, आणि सन्माननीय आयोगाने मान्यता दिलेल्या मर्यादेतच आहे.

**१.७.१.४ एकत्रित कामकाज व देखभाल खर्च**

सन्माननीय आयोगाच्या मान्यताप्राप्त रु.९६ कोटीच्या तुलनेत आ.व.२००८-०९ करिता कामकाज व देखभालीचा एकत्रित खर्च सुमारे र.१०१ कोटी इतका अपेक्षित आहे. कामकाज व देखभालीच्या खर्चातील प्रत्येक घटकाबाबतच्या खर्चात सन्माननीय आयोगाच्या मान्यताप्राप्त मर्यादेपेक्षा वाढ होण्याबद्दलची कारणे वरील परिच्छेदांद्वारे दर्शविली आहेत. खर्चातील वाढीस कारणीभूत ठरणाऱ्या नियंत्रण करणे शक्य नसलेल्या घटकांसह विचार करुन सन्माननीय आयोगाने या खर्चास मान्यता द्यावी अशी नम्र विनंती टाटा पॉवर–टी सन्माननीय आयोगास करत आहे.

### १.७.२ अवमूल्यन

सन्माननीय आयोगाच्या मान्यताप्राप्त रु.३१ कोटीच्या तुलनेत आ.व.२००८-०९ करिता कामकाज व देखभालीचा एकत्रित खर्च सुमारे रू.२८ कोटी इतका अपेक्षित आहे. आ.व.२००८-०९करिता या अवमूल्यनात या वर्षादरम्यान भांडवलीकृत केलेल्या मालमत्तेचे अवमूल्यन समाविष्ट केलेले नाही. परंतु, आधी नमूद केल्यानुसार यासंदर्भात टाटा पॉवर–टीने एटीईकडे अपील दाखल केले असून एटीईतर्फे टाटा पॉवरला अनुकूल निकाल प्राप्त झाल्यास त्यानुसार खर्चाच्या मान्यताप्राप्त हिशोबात योग्य त्या स्वरुपाचे बदल करण्याचा आपला हक्क टाटा पॉवर-टी राखून ठेवत आहे.

### १.७.३ कर्जावरील व्याज

गत वर्षांच्या नॉर्मेटिव्ह लोन्सवरील (आ.व.२००३-०४ करिता भांडवली खर्चाच्या ७० % आणि आ.व.२००४-०५ व आ.व.२००५-०६ करिता भांडवलीकरणाच्या ७० %) व्याजाव्यतिरिक्त आ.व.२००६-०७, आ.व.२००७-०८ आणि आ.व.२००८-०९ करिता भांडवलीकरण करण्यात येत असलेल्या भांडवली खर्चाच्या ७०% खर्चाच्या आधारे केला आहे. आपल्या या भांडवली खर्चासाठी टाटा पॉवर–टीने खालील दोन कर्जे घेतली आहेत :

- **आयडीएफसी कर्ज**

टाटा पॉवर-टीने भांडवली खर्चासाठी आयडीएफसीकडून याआधीच्या वर्षांमधे खालील अटींवर रु.४५० कोटींचे कर्ज घेतले आहेः

| | | |
|---|---|---|
| मुदत | : | ३ वर्ष परतफेड विलंबन अधिकार + ९ वर्षे |
| परतफेड | : | रु.५.६५ कोटीचे ३५ तिमाही हप्ते आणि ३६ वा हप्ता रु.२५२.२५ कोटींचा, या स्वरुपात परतफेड |
| व्याज दर | : | बेंचमार्क दर (५ वर्ष जी–सेक दर) + १.४५% प्रतिवर्ष (दरमहा देय) (किमान ८.९०% च्या मर्यादेत) |

हा व्याजाचा दर कर्जाच्या मुदतीच्या काळात बदलता राहण्याची शक्यता आहे असे वरील तक्त्यावरुन निदर्शनास येते आणि दिनांक २९ सप्टेंबर २००८ पासून एक वर्षासाठी तो १३% असावा अशी विनंती या बँकेने केली आहे. त्यानुसार टाटा पॉवर–टीने आ.व.२००८-०९ करिता सरासरी व्याजदर १०.९५% (८.९% व १३% मधील सरासरी) इतका विचारात घेतला आहे.

- **आयडीबीआय कर्ज**

टाटा पॉवरने परवाना क्षेत्रातील भांडवली खर्चासाठी आयडीबीआयकडून खालील अटींवर रु.४०० कोटींचे कर्ज घेतले आहेः

| | | |
|---|---|---|
| मुदत | : | ३ वर्ष परतफेड विलंबन अधिकार + १० वर्षे |
| परतफेड | : | परतफेड पहिली ९ वर्षे दर वर्षी ५% प्रमाणे आणि उर्वरित रक्कम १०व्या वर्षात |
| व्याज दर | : | बी पीएलआर (–) दर साल २.७६% नुसार दरमहा देय. वाटपाचे दिवशी व्याजाचा दर निश्चित केला जाईल. |

या कर्जापोटी आ.व.२००८-०९ दरम्यान देण्यात येत असलेल्या विविध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे आहेः

तक्ता १-७: आ.व.२००८-०९ – आयडीबीआय कर्ज आणि व्याजदर

| वाटपाचा महिना | वाटपाची रक्कम (रु. कोटीमधे) | व्याजाचा नक्त दर (%) |
|---|---|---|
| मार्च २००८ अखेर | २००.०० | १०.५० |
| ऑगस्ट २००८ | ९२.०० | ११.५० |
| ऑक्टोबर २००८ | ८४.०० | १४.०० |
| **एकूण** | **३७६.००** | **११.५३** |

यानुसार आ.व.२००८-०९ मध्ये भांडवलीकरणाचा सरासरी दर ११.५३% इतका विचारात घेतला आहे. वरील मुद्यांचा विचार करता आ.व.२००८-०९ करिता व्याजापोटी खर्चाचा अंदाज सन्माननीय आयोगाने मान्यता दिलेल्या रु.१३ कोटीच्या तुलनेत रु.१४ कोटी इतका अंदाजिला आहे.

वरील व्याजापोटीच्या खर्चाच्या हिशोबात आयडीबीआयच्या कर्जाची रक्कम टाटा पॉवर–जी, टाटा पॉवर–टी आणि टाटा पॉवर–डी या तीनही व्यवसायात उपयोगात आणली जाणार असल्याचे गृहीत धरले आहे. तीनही व्यवसायातील भांडवलीकरणाच्या आधारे आयडीबीआयच्या कर्जाची रु.४०० कोटीची रक्कम पुरेशी नाही. म्हणून टाटा पॉवर–टीला आ.व.२००८-०९ मधे आपल्या भांडवली खर्चासाठी आणखी (कर्जाच्या इतर स्रोतांकडून घ्याव्या लागणाऱ्या कर्जासह) कर्ज घ्यावे लागण्याची शक्यता आहे. या वाढीव कर्जाची रक्कम आणि अटी निश्चित होईपर्यंत या वर्षाच्या व्याजापोटीच्या खर्चाचा अंदाजित हिशोब करण्यासाठी ही वाढीव कर्जे वर उल्लेखिलेल्या अटींवरच उपलब्ध होतील असे गृहीत धरले आहे. प्रत्यक्ष घेतलेल्या कर्जांचा व्याजापोटीच्या खर्चाच्या रकमेवर होणारा परिणाम आ.व.२००८-०९ च्या सत्य-पडताळ्यादरम्यान समाविष्ट केला जाईल.

### १.७.४ वर्किंग कॅपिटलवरील व्याज

सन्माननीय आयोगाने टेरिफ नियमनांमधील घटक आणि नॉर्म्स निर्देशित करताना विचारात घेतलेल्या आ.व.२००८-०९ साठीच्या टेरिफ अर्जाच्या सादरीकरणाच्या वेळी अस्तित्वात असलेल्या १२.७५% व्याजदराने वर्किंग कॅपिटलवरील व्याजाचा हिशोब केला आहे. टाटा पॉवर–टीच्या वर्किंग कॅपिटलवरील व्याजापोटीचा आ.व.२००८-०९ करिता एकूण खर्च रु.६ इतका येतो.

टाटा पॉवरने आ.व.२००८-०९ च्या पहिल्या सहामाहीमध्ये विविध स्रोतांकडून लघु मदतीचे कर्जे घेतली आहेत. आ.व.२००८-०९च्या पहिल्या सहामाहीसाठी लघु मुदतीने घेतलेल्या कर्जावरील व्याजापोटी टाटा पॉवरने रु.७ कोटी दिले असल्याचा हिशोब निघतो. त्यानुसार अशा लघु मुदतीच्या कर्जावरील व्याजाची या वर्षासाठीची अंदाजित रक्कम रु.१५ कोटी इतकी अंदाजिली आहे. टाटा पॉवरच्या कामकाजातील एकूण वर्किंग कॅपिटलमधील टाटा पॉवर–टीच्या नॉर्मेटिव्ह वर्किंग कॅपिटलच्या हिश्शाच्या आधाराने काढलेल्या प्रमाणात या रकमेपैकी टाटा पॉवर–जीचा हिस्सा रु.१ कोटी इतका येतो.

वर उल्लेख केल्यानुसार व्याजापोटी दिलेल्या प्रत्यक्ष रकमांच्या व्यतिरिक्त भाग १.३.४ व ४.४.२ मधे दर्शविल्यानुसार वर्किंग कॅपिटलच्या प्रत्यक्ष आवश्यकतेवरील नॉर्मेटिव्ह व्याजदरावर आधारित (एसबीआय पीएलआर) व्याजाचा विचार फायदा आणि तोट्याचा हिशोब करण्यासाठी करण्यात यावा अशी टाटा पॉवर–जी विनंती करत आहे. त्यानुसार प्रत्यक्ष वर्किंग कॅपिटलवरील व्याजापोटीची टाटा पॉवर–टीने हिशोब केलेली रक्कम रु.३० कोटी येते.

२६ मे २००८ च्या टेरिफ आदेशात सन्माननीय आयोगाने स्वीकारलेल्या धोरणाचा आयोगाने पुनर्विचार करावा, आणि वर्किंग कॅपिटलच्या मुद्यासह फायदा आणि तोट्याच्या हिशोबासाठीच्या प्रस्तावित पध्दतीस मान्यता द्यावी अशी टाटा पॉवर–टी सन्माननीय आयोगास विनंती करत आहे.

### १.७.५ इतर फायनान्स चार्जेस

आ.व.२००८-०९ करिता फायनान्स चार्जेससंदर्भातील खर्चासाठी रु.१ कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

### १.७.६ रेग्युलेटरी इक्विटीवरील परतावा

भांडवलीकृत खर्च आणि डेटःइक्विटीची ७०:३० अशी प्रमाणपध्दत याच्या आधारे आलेली इक्विटी आणि त्यावरील परताव्याची आ.व. २००८-०९ साठीची अंदाजित रक्कम परताव्याच्या मान्यताप्राप्त रु.६३ कोटींच्या तुलनेत रु.६३ कोटी इतकी आहे.

### १.७.७ आयकर

कराच्या रकमेचा हिशोब करण्यामधे टाटा पॉवर–जीने सन्माननीय आयोगाच्या सन २००७ च्या दावा क्र.६४,६५ आणि ६६ संदर्भातील निकालांचाही विचार अंतर्भूत केला आहे. आयकर कायदा १९६१ च्या तरतुदींनुसार आणि नोशनल डेटवरील कर बचतीचा हिशोब धरुन आयकराची रक्कम मान्यताप्राप्त रु.३० कोटीच्या तुलनेत रु.४२ कोटी येत आहे.

### १.७.८ स्टॅट्युटरी ॲप्रोप्रिएशन्स

टेरिफ नियमनांच्या तरतुदींनुसार आ.व.२००८-०९ करिता सन्माननीय आयोगाने मान्यता दिलेल्या रु.३ कोटीच्या तुलनेत स्टॅट्युटरी ॲप्रोप्रिएशन्सकरिता रु.३ कोटीची तरतूद केली आहे.

### १.७.९ नॉन-टेरिफ इन्कम

टाटा पॉवर–टीने आ.व.२००८-०९ करिता पुनरावर्ती घटकांबाबतचे रु.६ कोटी आणि पुनरावर्ती नसलेल्या घटकांबाबतचे रु.३ कोटी यांचा समावेश असलेली नॉन-टेरिफ इन्कमची रक्कम रु.९ कोटी इतकी अंदाजिली आहे.

### १.७.१० आ.व.२००८-०९ करिता वार्षिक पारेषण चार्जेस

वर उल्लेख केलेल्या विविध खर्चांच्या आधारे, आ.व२००८-०९ करिता टाटा पॉवर–टीची सुधारित वार्षिक महसूल आवश्यकता खालीलप्रमाणे आहेः

**तक्ता १-८ः आ.व.२००८-०९ – सुधारित वार्षिक महसूल आवश्यकता**

**रु. कोटीमधे**

| तपशील | आयोगाची मान्यता | आ.व.२००८-०९ सुधारित अंदाज |
|---|---|---|
| कामकाज व देखभाल खर्च | ९६ | १०१ |
| - कर्मचारीसंबंधित खर्च | ५६ | ६० |
| - व्यवस्थापन आणि सर्वसाधारण खर्च (ब्रँड इक्विटी परिणामासह नक्त) | २७ | २९ |
| - दुरुस्ती आणि देखभाल खर्च | १३ | १२ |
| दीर्घ मुदतीच्या कर्जावरील व्याज | १३ | १४ |
| वर्किंग कॅपिटलवरील व्याज | ६ | ६ |
| इतर फायनान्स चार्जेस | - | १ |
| अवमूल्यन | ३१ | २८ |
| इक्विटीवरील परतावा | ६३ | ६३ |
| आयकर | ३० | ४२ |
| स्टॅट्युटरी ॲप्रोप्रिएशन्स | ३ | ३ |
| वजा : नॉन – टेरिफ इन्कम | ९ | ९ |
| वजा : टाटा पॉवर-जी आणि टाटा पॉवर-डीवर विभाजित केलेली लोड कंट्रोल सेंटरसंबंधीचा खर्च | ० | ४ |
| वार्षिक पारेषण चार्जेस | २३३ | २४४ |

### १.७.११ आ.व.२००८-०९ मधील फायदा आणि तोट्याचे विभाजन

भाग ४.१२ मधे दिलेल्या कारणांनुसार आणि वर्गीकरणानुसार, आ.व.२००८-०९ साठीच्या खर्चातील कामकाज व देखभालीच्या खर्चातील काही खर्च आणि वर्किंग कॅपिटलवरील व्याजापोटीचा खर्च वगळता बाकी बहुतांश खर्च नियंत्रण करणे शक्य नसलेल्या स्वरुपाचे आहेत. नियंत्रण करणे शक्य नसलेल्या घटकांचा परिणाम सुमारे रु.२.३० कोटी आहे. आ.व. २००८-०९ करिता फायदा आणि तोट्याचा हिशोब करताना या रकमेचा विचार करण्यात यावा अशी टाटा पॉवर–टी सन्माननीय आयोगाला नम्र विनंती करत आहे.

### १.७.११.१ कामकाज व देखभाल खर्च

या सदराखालील काही विशिष्ट घटकांबाबतच्या खर्चातील वाढ टाटा पॉवर-टीच्या नियंत्रणाबाहेर असलेल्या कारणांमुळे झालेली आहे. फायदा आणि तोट्याचा हिशोब करताना अशा नियंत्रण करणे शक्य नसलेल्या घटकांसंदर्भातील खर्च मान्यताप्राप्त खर्चात जमा करण्यात आला आहेः

**तक्ता १-९ः आ.व.२००८-०९ – कामकाज व देखभाल खर्चातील बदलाच्या परिणामासह फायदा आणि तोटा**

**रु. कोटीमधे**

| अनुक्र. | तपशील | सुधारित अंदाज |
|---|---|---|
| १ | आ.व.२००८-०९ करिता मान्यताप्राप्त कामकाज व देखभाल खर्च | ९६ |
| २ | कामकाज व देखभाल खर्चाचा सुधारित अंदाज | १०१ |
| ३ | अंदाजित खर्चापैकी नियंत्रण करणे शक्य नसलेला खर्च | १ |
| ४ | नियंत्रण करणे शक्य असलेला सुधारित खर्च (२-३) | ९९ |
| ५ | **तोटा / फायदा – (४ – १)** | **३** |
| ६ | ग्राहकांकडे हस्तांतरित (१/३ हिस्सा) | ८ |
| **७** | **नक्त अधिकृती (१ + ३ + ६)** | **९८** |

### १.७.११.२ वर्किंग कॅपिटलवरील व्याज

खालील तक्त्यात वर्किंग कॅपिटलवरील व्याजाच्या खर्चाच्या विभाजनाचा हिशोब दर्शविला आहे :

**तक्ता १-१०ः आ.व.२००८-०९ – वर्किंग कॅपिटलवरील व्याजापोटी आलेला फायदा / तोटा**

| अनुक्र. | तपशील | रु. कोटीमधे |
|---|---|---|
| १ | मान्यताप्राप्त नॉर्म्सनुसार वर्किंग कॅपिटलवरील नॉर्मेटिव्ह व्याज | ६ |
| २ | वर्किंग कॅपिटलवरील प्रत्यक्ष व्याज | १ |
| ३ | नियंत्रण करणे शक्य नसलेला खर्च | ० |
| ४ | नियंत्रण करणे शक्य नसलेला खर्च वगळून प्रत्यक्ष खर्च (२-३) | १ |
| ५ | - वितरण परवानाधारकांना हस्तांतरित केलेली रक्कम (फायदा/तोट्याचा १/३ हिस्सा) (१/३ * (१)-(४)) | २ |
| ६ | टाटा पॉवर–टीने राखून ठेवण्यास परवानगी देण्यात आलेली रक्कम (फायदा/तोट्याचा १/३ हिस्सा) (१/३ * (१)-(४)) | २ |
| **७** | **नक्त अधिकृती (३)+(४)+(५)+(६)** | **४** |

### १.७.१२ टाटा पॉवर लोड कंट्रोल सेंटरसंबंधित खर्चाचे विभाजन

ट्रॉम्बे, खोपोली, भिरा आणि भिवपुरी येथील वीज निर्मिती केंद्रांद्वारे टाटा पॉवर–जी बीईएसटी, आरइन्फ्रा आणि टाटा पॉवरचा वितरण व्यवसाय, टाटा पॉवर–डी या वितरण परवानाधारकांना वीज पुरवते. तसेच ही निर्मिलेली वीज आणि देशाच्या इतर भागांमधून खरेदी केलेली वीज पारेषित करण्यासाठी टाटा पॉवर–टी आपली पारेषण मालमत्ता उपयोगात आणते. टाटा पॉवरचे पारेषण जाल हे एमएसईटीसीएल आणि आरइन्फ्राच्या व्यवस्थेशी विविध ठिकाणी जोडलेले आहे. टाटा पॉवर जी, टी व डीची विविध प्रकारची कामे पार पाडण्याची जबाबदारी टाटा पॉवरचे लोड कंट्रोल सेंटरवर (एलसीसी) आहे.

तसेच टाटा पॉवरचे एलसीसी हे एसएलडीसी आणि इतर आस्थापनांबरोबर समन्वयन साधण्यासाठीचे एक केंद्रीय संपर्कस्थल म्हणूनही काम करते. एलसीसीच्या कामकाजासंबंधीचा खर्च सध्या टाटा पॉवरच्या पारेषण व्यवसायाच्या अंदाजपत्राचा एक भाग आहे. एलसीसीच्या पायाभूत व्यवस्था, कामकाज व देखभालीच्या खर्चाचे टाटा पॉवरच्या वीज निर्मिती, पारेषण आणि वितरण व्यवसायांमध्ये विभाजन करण्याच्या पध्दतीचे या भागात आरेखन करण्यात आले आहे.

(कर्मचारीसंबंधित खर्चापैकी) रु.६६ लाख इतका खर्च एसएलडीसीच्या कामासाठी येत असल्याचे दर्शविता येत असल्याचे आ.व.२००७-०८च्या एपीआर अर्जात असे विनीत करण्यात आले होते. एसएलडीसी आता फक्त मुंबईतील वीज व्यवहाराच्या नियंत्रणासाठी एक सब-लोड डिस्पॅच सेंटर उभारत असल्यामुळे, या संदर्भातील कर्मचारीसंबंधित प्रयत्न आणि खर्च टाटा पॉवरच्या टाटा पॉवर–जी, टाटा पॉवर–टी,आणि टाटा पॉवर–डी, या व्यवसायांमधे विभाजित केला जाईल असे या भागात गृहीत धरण्यात आले आहे. या खर्चाचे विभाजन खर्चाच्या स्वरुपावरुन ठरवले जाईल.

खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार एलसीसीच्या खर्चाचे टाटा पॉवर–जी, टाटा पॉवर–टी,आणि टाटा पॉवर–डी दरम्यानचे विभाजन असेलः

**तक्ता १-११: आ.व.२००८-०९ – टाटा पॉवर–जी, टी व डी दरम्यान एलसीसी खर्चाचे विभाजन**

| क्रमांक | एलसीसी खर्चाचा घटक | रक्कम (रु. कोटीमधे) | टाटा पॉवर–जी चा हिस्सा | टाटा पॉवर–टी चा हिस्सा | टाटा पॉवर–डी चा हिस्सा |
|---|---|---|---|---|---|
| १ | एकूण कामकाज व देखभाल खर्च | ४.६६ | | | |
| १अ | कर्मचारीसंबंधित खर्च | ३.७३ | १.१४ | १.१५ | १.४४ |
| १ब | व्यवस्थापन आणि सर्वसाधारण खर्च | ०.३२ | ०.०९ | ०.२२ | ०.०२ |
| १क | दुरुस्ती व देखभाल खर्च | ०.६१ | ०.१७ | ०.४२ | ०.०३ |
| २ | नॉर्मेटिव्ह कर्जावरील व्याज | ०.३७ | ०.१० | ०.२५ | ०.०२ |
| ३ | वर्किंग कॅपिटलवरील व्याज | ०.१४ | ०.०४ | ०.१० | ०.०१ |
| ४ | अवमूल्यन | ०.७८ | ०.२१ | ०.५३ | ०.०४ |
| ५ | इक्विटीवरील परतावा | ०.६४ | ०.१७ | ०.४३ | ०.०३ |
| ६ | आयकर | ०.४१ | ०.११ | ०.२८ | ०.०२ |
| **७** | **एकूण** | **७.००** | **२.०३** | **३.३७** | **१.६०** |

### १.७.१३ आ.व.२००८-०९ करिता नक्त वार्षिक पारेषण चार्जेस आणि फरक

आ.व.२००८-०९ करिता महसूल, फायदा आणि तोट्याच्या विभाजनासहित खर्चाचा तपशील आणि परिणामी फरक याचा सारांश खालीलप्रमाणे आहे :

तक्ता १-१२: आ.व.२००८-०९ – नक्त वार्षिक पारेषण चार्जेस

रु. कोटीमधे

| तपशील | आयोगाची मान्यता | आ.व.२००८-०९ सुधारित अंदाज |
|---|---|---|
| **कामकाज व देखभाल खर्च** | ९६ | १०१ |
| - कर्मचारीसंबंधित खर्च | ५६ | ६० |
| - व्यवस्थापन आणि सर्वसाधारण खर्च (ब्रँड इक्विटी परिणामासह नक्त) | २७ | २९ |
| - दुरुस्ती आणि देखभाल खर्च | १३ | १२ |
| दीर्घ मुदतीच्या कर्जावरील व्याज | १३ | १४ |
| वर्किंग कॅपिटलवरील व्याज | ६ | ६ |
| इतर फायनान्स चार्जेस | - | १ |
| अवमूल्यन | ३१ | २८ |
| इक्विटीवरील परतावा | ६३ | ६३ |
| अयकर | ३० | ४२ |
| स्टॅट्युटरी ॲप्रोप्रिएशन्स | ३ | ३ |
| वजा : नॉन – टेरिफ इन्कम | ९ | ९ |
| वजा : टाटा पॉवर–जी व टाटा पॉवर–डीवर विभाजिलेला लोड कंट्रोल सेंटरसंबंधित खर्च | - | ४ |
| **वार्षिक पारेषण चार्जेस** | **२३३** | **२४४** |

टाटा पॉवर–टी आ.व.२००८-०९ करिता वरील एआरआरला मान्यता देण्याची सन्माननीय आयोगास नम्र विनंती करत आहे.

## १.८ आ.व. २००८-०९ करिता फरक/(फायदा)

२६ मे २००८ च्या आदेशात सन्माननीय आयोगाने मान्यता दिलेल्या पारेषण चार्जेसनुसार महसूल, नॉन-टिरिफ इन्कम, मान्यता दिलेला खर्च, नियंत्रण करणे शक्य नसलेला खर्च आणि फायदा व तोट्याचे विभाजन, याचा विचार करता नक्त वार्षिक महसूल आवश्यकतेपेक्षा उत्पन्न जास्त होते; वत्यामुळे रु.२ कोटी इतका अतिरिक्त महसूल निर्माण होतो. खालील तक्त्यात या फरकाचा हिशोब दिला आहेः

तक्ता १-१३: आ.व.२००८-०९ नक्त वार्षिक महसूल आवश्यकता व फरक

रु. कोटीमधे

| | | आ.व.२००८-०९ | | | |
|---|---|---|---|---|---|
| अनुक्र. | तपशील | णान्यताप्राप्त | नियमनानुसार अधिकृती | नियंत्रण करणे शक्य असलेल्या घटकांपासूनचे ग्राहकांकडे हस्तांतरित केलेले फायदे/(तोटे) | फायदा/(तोट्याच्या) परिणामानंतर नियंत्रण करणे शक्य असलेल्या घटकांपासून (राखून ठेवण्याच्या रकमेसह) नक्त अधिकृती |
| एक | महसूल | | | | २५२ |
| | - पारेषण चार्जेस | | | | २४२ |
| | - इतर इन्कम | | | | ९ |
| | | | | | |
| दोन | खर्च | | | | |
| | | | | | |
| १ | कामकाज व देखभाल खर्च | ९६ | ९६ | (१) | ९८ |
| २ | अवमूल्यनासंदर्भातील अग्रिम हप्त्यासह अवमूल्यन, | ३१ | २८ | | २८ |
| ३ | दीर्घ मुदतीच्या कर्ज भांडवलावरील व्याज | १३ | १४ | | १४ |
| ४ | वर्किंग कॅपिटलवरील व्याज | ६ | ६ | २ | ४ |
| ५ | इतर फायनान्स चार्जेस | - | १ | | १ |
| ६ | स्टॅट्युटरी ॲप्रोप्रिएशन्स/वेकल्पिक राखीव | ३ | ३ | | ३ |
| ७ | आयकर | ३० | ४२ | | ४२ |
| ८ | इक्विटीवरील परतावा | ६३ | ६३ | | ६३ |
| ९ | वजा : टाटा पॉवर–जी व टाटा पॉवर–डी दरम्यान एलसीसीसंबंधित खर्चाचे विभाजन | - | ४ | | ४ |
| १० | एकूण खर्च | २४२ | २४९ | ० | २५० |
| | | | | | |
| तीन | फरक / (फायदा) | | | | २ |

**आ.व.२००८-०९ च्या येत्या सहामाहीसाठीच्या या संख्या अंदाजित संख्या आहेत हे लक्षात घेऊन, टाटा पॉवर–टी या वर्षाच्या या अंदाजित संख्यांसाठी पुनर्विचार करण्याबाबत कोणतीही विनंती करत नाही. परंतु पूर्ण वर्षाच्या जमाखर्चाची आकडेवारी निश्चित झाल्यानंतर म्हणजेच सत्य-पडताळ्याच्या प्रक्रियेदरम्यान अशा पुनर्विचार करण्याची विनंती करण्याचा आपला हक्क टाटा पॉवर–टी राखून ठेवत आहे.**

### १.८.१ टाटा पॉवर–टीकरिता वार्षिक इन्सेन्टिव्ह

टाटा पॉवर–जी आणि टाटा पॉवर–डी या इतर व्यवसायांसदर्भातील चार्जेसपेक्षा वेगळे स्वरुप असलेले टाटा पॉवर–टीकरिता सन्माननीय आयोगाने मान्यता दिलेले वार्षिक फिक्स्ड चार्जेस हे महाराष्ट्रातील इतर पारेषण परवानाधारकांच्या वार्षिक फिक्स्ड चार्जेसबरोबर एकत्रित (पूल) करुन ठरवलेले आहेत. त्यानंतर ‘को-इन्सिडन्ट पीक डिमांड’ सारख्या एखाद्या घटकाच्या आधारे वितरण परवानाधारकांदरम्यान ही पूल्ड रक्कम विभागली जाते. त्यानुसार, जर एखाद्या पारेषण परवानाधारकाने (९८% पेक्षा

जास्त उपलब्धतेसाठीच्या) इन्सेन्टिव्हची मागणी वाढवली, तर या वाढवलेल्या रकमेसाठी उत्पन्न मिळणार नसल्यामुळे (या पूल्ड रकमेचा जमा व विभाजनाचा हिशोब ठेवणाऱ्या) एसटीयुकडून ती मागणी नाकारली जाते. आ.व.२०१०–११ करिता सार होणाऱ्या एआरआरद्वारे आ.व.२००८-०९साठीचा असा इन्सेन्टिव्ह मागण्याचा एकमेव मार्ग त्यामुळे उपलब्ध आहे. कोणतेही संयुक्तिक कारण नसताना इन्सेन्टिव्ह प्राप्त होण्यातला या विलंबाकडे सन्माननीय आयोगाने लक्ष द्यावे अशी विनंती आहे.

म्हणून वर्षाअखेरीस (पारेषण परवानाधारकाने मागणी केलेल्या) इन्सेन्टिव्हच्या रकमेसाठी वितरण परवानाधारकांवर तात्काळ वीज देयक जारी करण्यास एसटीयुला निर्देश द्यावयाची विनंती टाटा पॉवर–टी सन्माननीय आयोगास करत आहे. वितरण परवानाधारकांदरम्यान पारेषण चार्जेसच्या होणाऱ्या विभाजनाच्या प्रमाणातच या पारेषण परवानाधारकाने मागणी केलेल्या इन्सेन्टिव्हचे विभाजनही होऊ शकते.

## १.९ आ.व.२००९-१० करिता अंदाजित वार्षिक कामगिरी

या भागात आ.व.२००९-१० करिता टाटा पॉवर-टीची अंदाजित वार्षिक महसूल आवश्यकता सादर केली आहे.

### १.९.१ भांडवली खर्च

या भागात यापूर्वीच्या गुंतवणुकी आणि आ.व.२००८-०९मधील गुंतवणूक व भांडवलीकरण यांच्या आधारे टाटा पॉवर–टीचा आ.व.२००९-१० साठीचा वार्षिक पारेषण चार्जेसचा निश्चित केलेला आहे.

मुंबई शहराची विजेची मागणी ५% दराने वाढत आहे. या मागणीची पूर्तता करण्यासाठी पारेषण व्यवस्थेचा दर्जा उंचावणे आणि त्यात भरीव सुधारणा करणे आवश्यक आहे.

आ.व.२००९-१० करिता टाटा पॉवर–टीने खालील गुंतवणुकीच्या योजना आखल्या आहेतः

**तक्ता १-१४ः आ.व.२००९-१० – प्रस्तावित भांडवली खर्च**

**रु.कोटीमधे**

| तपशील | आ.व. २००९-१० | |
|---|---|---|
| | भांडवली खर्च | भांडवलीकरण |
| पुढे चालू असलेल्या योजना | | |
| डीपीआर योजना | ६२४ | २८७ |
| नॉन-डीपीआर योना | २२ | २१ |
| एकूण पुढे चालू असलेल्या योजना | ६४६ | ३०८ |
| नव्या योजना | | |
| डीपीआर योजना | ३३ | १० |
| नॉन-डीपीआर योना | २४ | २१ |
| एकूण नव्या योजना | ५८ | ३१ |
| एचओ व एसएस विभाजन | १० | ६ |
| एकूण | ७१४ | ३४५ |

### १.९.२ वार्षिक पारेषण चार्जेस

भांडवली खर्च, (आणि त्याच्या परिणामाने येणारा भांडवलीकृत खर्च, इक्विटीचा घटक आणि नॉर्मेटिव्ह डेट) यांच्या आधारे टाटा पॉवर–टीचे हिशोब केलेले पारेषण चार्जेस त्यासंदर्भातील टेरिफ नियमनांस अनुसरुन निश्चित केले आहेत.

वरील आ.व.२००९-१० साठीची वार्षिक महसूल आवश्यकतेचा हिशोब करण्यासाठी वरील वार्षिक महसूल आवश्यकतेच्या रकमेवर होणारा नॉन-टेरिफ इन्कम, टाटा पॉवर–जी व टाटा पॉवर–डीमध्ये विभाजित झालेली एलसीसीसंदर्भातील खर्चाची रक्कम यांचा नक्त परिणाम लक्षात घेतला गेला आहे.

### १.९.३ कामकाज व देखभाल खर्च

खालील भागांमधे कामकाज व देखभाल खर्चाचे विविध घटक स्पष्ट करण्यात आले आहेतः

### १.९.३.१ कर्मचारीसंबंधित खर्च

सन्माननीय आयोगाने मान्यता दिलेल्या रु.४८ कोटीच्या तुलनेत आ.व.२००९-१० चे कर्मचारीसंबंधित प्रक्षेपित खर्च रु.६६ कोटी आहेत. आ.व.२००७-०८च्या एपीआर अर्जात चर्चिल्यानुसार एएस-१५ आरचा परिणाम आणि कर्मचारीसंबंधातील मनुष्यबळाची सर्वसाधारण पातळी राखण्याबाबतच्या खर्चात माफक प्रमाणात झालेली वाढ (रु.१.५ कोटी) ही या फरकामागची मुख्य कारणे आहेत.

आ.व.२००८-०९ मधील कर्मचारीसंबंधित अंदाजित खर्चात होणाऱ्या वाढीची कारणे यापूर्वी स्पष्ट करण्यात आली आहेत. या मुद्यांचा विचार करुन आ.व.२००८-०९ करिता अंदाजित (रु.६० कोटीच्या) खर्चामध्ये झालेली (रु.४ कोटीची) वाढ ही वाढत्या महागाईचा सामना करण्यासाठी ती आवश्यक असल्याने रास्त आहे.

### १.९.३.२ व्यवस्थापन व सर्वसाधारण खर्च

आ.व.२००९-१० करिता व्यवस्थापन व सर्वसाधारण खर्चाची रु.३३ कोटीची प्रक्षेपित अंदाजित रक्म बहुवर्षीय टेरिफ आदेशाद्वारे मान्यता दिलेल्या रकमेपेक्षा रु.५ कोटीने आणि आ.व.२००८-०९ करिता सादर केलेल्या सुधारित अंदाजपत्रातील रकमेपेक्षा रु.४ कोटीने जास्त आहे. एमबीपीटीतर्फे वे लीव्ह फीमधे होणारी वाढ, वैकल्पिक कारणांसाठी तरतूद इत्यादि कारणांचा या फरकाच्या मुख्य कारणांमधे समावेश आहे.
आ.व.२००८-० करिता ही अंदाजिलेली रक्कम रु.२९ कोटी आहे. ६.५% दराने वाढणारी महागाई लक्षात घेता रु.२ कोटीची वाढ रास्त आहे.

### १.९.३.३ दुरुस्ती व देखभाल खर्च

आ.व.२००९-१० करिता दुरुस्ती व देखभाल खर्च रु.१५ कोटी अंदाजित असून आयोगाने मान्यता दिलेल्या मर्यादेतच तो राखलेला आहे.

### १.९.३.४ एकत्रित कामकाज व देखभाल खर्च

आ.व.२००९-१० करिता कामकाज व देखभालीचा अंदाजित खर्च खालीलप्रमाणे आहे :

तक्ता १-१५: आ.व.२००९-१० – कामकाज व देखभाल खर्च

रु. कोटीमधे

| तपशील | आयोगाची मान्यता (एपीआर आदेश) | आ.व.२००८-०९ सुधारित अंदाज | आ.व.२००९-१० आयोगाची मान्यता (बहुवर्षीय टेरिफ आदेश) | आ.व.२००९-१० सुधारित अंदाज |
|---|---|---|---|---|
| कर्मचारीसंबंधित खर्च | ५६ | ६० | ४८ | ६६ |
| व्यवस्थापन व सर्वसाधारण खर्च | २७ | ३२ | २८ | ३७ |
| वजा : ब्रँड इक्विटी | | (३) | | (३) |
| दुरुस्ती आणि देखभाल खर्च | १३ | १२ | १५ | १५ |
| एकूण | ९६ | १०१ | ९१ | ११५ |

खर्चात वाढ होण्यास कारणीभूत असलेले नियंत्रण करणे शक्य नसलेले विविध घटक लक्षात घेऊन या खर्चास मान्यता देण्याची टाटा पॉवर–टी सन्माननीय आयोगास नम्र विनंती करत आहे.

### १.९.४ कर्जावरील व्याज

गत वर्षांच्या नॉर्मेटिव्ह लोन्सवरील (आ.व.२००३-०४ करिता भांडवली खर्चाच्या ७० % आणि आ.व.२००४-०५, आ.व.२००५-०६ व आ.व. २००५-०६ करिता भांडवलीकरणाच्या ७० %) व्याजाव्यतिरिक्त आ.व.२००६-०७ व आ.व.२००७-०८ साठीची प्रत्यक्ष कर्जे, आ.व.२००८-०९साठीचे अंदाज, आ.व.२००९-१० मध्ये भांडवलीकरण होणाऱ्या खर्चाच्या ७०% रकमेवरील व्याज या सर्व गोष्टी कर्जावरील व्याजाचा हिशोब करताना लक्षात घेतल्या आहेत.

- **आयडीएफसी कर्ज**

टाटा पॉवरने चालू भांडवली खर्चासाठी आयडीएफसीकडून खालील अटींवर रु.४५० कोटींचे कर्ज घेतले आहेः

——————————————————————————————————

मुदत : ३ वर्षे परतफेड विलंबन अधिकार + ९ वर्षे
परतफेड : रु.५.६५ कोटीचे ३५ तिमाही हप्ते आणि ३६ वा हप्ता रु.२५२.२५ कोटींचा, या स्वरुपात परतफेड
व्याज दर : बेंचमार्क दर (५ वर्ष जी–सेक दर) + १.४५% प्रतिवर्ष (दरमहा देय)

——————————————————————————————————

कर्जाच्या मुदतीदरम्यानच्या काळात व्याजाचा दर बदलत राहील असे वरील तक्त्यावरुन निदर्शनास येते. आयडीएफसीने दिनांक २९ सप्टेंबर २००८ च्या पत्राद्वारे हा व्याजदर १३% वर पुन्हा निर्धारित करण्याची मागणी केली आहे. त्यानुसार, टाटा पॉवर–जीने आ.व.२००९-१० करिता व्याजाचा १३% दर हिशोबात घेतला आहे.

- **आयडीबीआय कर्ज**

टाटा पॉवरने परवानाक्षेत्रातील भांडवली खर्चासाठी आयडीबीआयकडून खालील अटींवर रु.४०० कोटींचे आणखी एक कर्ज घेतले आहे. या कर्जाच्या परतफेडीच्या अटी थोडक्यात पुढीलप्रमाणे आहेतः

| | | |
|---|---|---|
| मुदत | : | ३ वर्ष परतफेड विलंबन अधिकार + १० वर्षे |
| परतफेड | : | दर वर्षी ५% प्रमाणे ९ वर्षे आणि उर्वरित रक्कम १०व्या वर्षात |
| व्याज दर | : | बी पीएलआर (–) दर साल २.७६% दरमहा देय. कर्जाची रक्कम देण्याच्या दिवशी व्याजाचा दर निश्चित करण्यात येईल. |

आ.व.२००८-०९ करिता व्याज आणि फायनान्स चार्जेसचा हिशोब आ.व.२००९-१० दरम्यान भांडवलीकरण करण्यात येणार असलेल्या भांडवली खर्चाच्या आधारे केला आहे तसेच त्यापूर्वीच्या काळातील भांडवलीकरण आणि भांडवली खर्चाचा समावेश केल्यानंतर करण्यात आला आहे. आ.व.२००८-०९ मध्ये आयडीबीआयकडून घेतलेल्या कर्जाच्या अटींनुसार व्याजाचा हिशोब करण्यात आला आहे. आ.व.२००८-०९ च्या वेटेड ॲव्हरेज रेटच्या आधारे आ.व.२००९-१० मधील भांडवलीकरणावरील व्याजाच्या हिशोबासाठी व्याजदर ११.५३% इतका विचारात घेण्यात आला आहे.

बहुवर्षीय टेरिफ आदेशामध्ये मान्यता दिलेल्या रु.१७ कोटीच्या तुलनेत आ.व.२००९-१० करिता व्याजापोटीचा खचू रु.३६ कोटी रुपये इतका अंदाजिला आहे. कर्जावरील व्याजाच्या दरात आयडीएफसीने केलेली वाढ आणि आयडीबीआयकडून घेतलेले नवीन कर्ज तसेच भांडवलीकरणाचे सुधारित अंदाज यामुळे ही वाढ होत आहे.

तसेच, भाग ५.७.१ मधे नमूद केल्यानुसार, आ.व.२००९-१० करिता भांडवली खर्चासाठी लागणाऱ्या या वाढीव कर्जाची रक्कम आणि अटी निश्चित होईपर्यंत या वर्षाच्या व्याजापोटीच्या खर्चाचा अंदाजित हिशोब करण्यासाठी ही वाढीव कर्जे वर उल्लेखिलेल्या अटींवरच उपलब्ध होतील असे गृहीत धरले आहे. प्रत्यक्ष घेतलेल्या कर्जांचा व्याजापोटीच्या खर्चाच्या रकमेवर होणारा परिणाम आ.व.२००९-१० च्या ॲन्युअल पर्फॉर्मन्स रिव्ह्यूदरम्यान समाविष्ट केला जाईल.

### १.९.४.१ वर्किंग कॅपिटलवरील व्याज

सन्माननीय आयोगाने टेरिफ नियमनांमधे निर्देशित केलेल्या तत्वांच्या आधारे वर्किंग कॅपिटलवरील व्याजाचा हिशोब केला आहे. टेरिफ नियमनांमधे स्पष्ट केलेला व्याजाचा दर (स्टेट बँक ऑफ इंडियाचा लघु मुदतीच्या कर्जावरील प्राईम लेंडिंग रेट) हा वर्षाभरात खालीलप्रमाणे बदलता राहिला आहे : आ.व.ए००९-१० करिता वर्किंग कॅपिटलवरील व्याजाचा अंदाज करण्यासाठी सध्याच्या व्याजदरावर आधारुन व्याजाचा दर १३.००% असा गृहीत धरला आहे. आ.व.२००९-१० करिता टाटा पॉवरसाठी वर्किंग कॅपिटलवरील व्याजापोटीची रक्कम रु.७ कोटी येते.

### १.९.५ अवमूल्यन

आ.व.२००९-१० करिता अंदाजित अवमूल्यनाची रक्कम रु.३२ कोटी आहे. आ.व.२००९-१० च्या अवमूल्यनामध्ये या वर्षादरम्यान भांडवलीकृत झालेल्या मालमत्तेच्या अवमूल्यनाचा समावेश नाही. परंतु, या संदर्भात टाटा पॉवर–टीने एटीई कडे अपील केले असल्याकारणाने, एटीईच्या निर्णयाच्या आधारे खर्चाच्या रकमेत योग्य त्या स्वरुपाचे बदल करण्याचा आपला हक्क टाटा पॉवर–जी राखून ठेवत आहे.

### १.९.६ रेग्युलेटरी इक्विटीवरील परतावा

वर्षाच्या सुरुवातीच्या ओपनिंग बॅलन्सवर १४% दराने आणि या वर्षादरम्यान झालेल्या भांडवलीकरणामुळे वाढ झालेल्या इक्विटीवर ७% दराने इक्विटीवरील परताव्याचा हिशोब करण्यात आला आहे. याच्या आधाराने, आ.व.२००९-१० करिता इक्विटीवरील परताव्याची रक्कम रु.७४ कोटी येते.

### १.९.७ स्टॅट्युटरी ॲप्रोप्रिएशन्स

सन्माननीय आयोगाने परवानगी दिलेल्या ओपनिंग जीएफएच्या ०.२५% दराने टाटा पॉवर–टीने वेकल्पिक राखीव निधी उभारण्यासाठी तरतूद केली आहे. त्यानुसार आ.व.२००९-१० करिता स्टॅट्युटरी ॲप्रोप्रिएशन्सची अंदाजित रक्कम रु.३ कोटी येते.

### १.९.८ आयकर

सन २००७ च्या दावा क्र.६४, ६५ व ६६ मधील कराच्या हिशोबासंदर्भातील निकालानुसार. आयकर कायद्याच्या तरतुदींनुसार आणि दीर्घ मुदतीच्या कर्जावरील व्याज तसेच वर्किंग कॅपिटलवरील व्याजावरील कर बचतींचा विचार करुन, आ.व.२००९-१० ची आयकराची रक्कम **रु.३७ कोटी** येते.

संदर्भित वर्षादरम्यान होणाऱ्या भांडवलीकरणामुळे आयकर कायद्यांतर्गत विचारात घेतलेल्या अवमूल्यनावर परिणाम होत असल्यामुळे आयकराच्या प्रक्षेपित अंदाजातही त्याचे लगेच प्रतिबिंब पडते असे टाटा पॉवर–टी येथे नमूद करु इच्छिते. प्रस्तावित भांडवलीकरणाच्या तुलनेत सन्माननीय आयोगाने मान्यता दिलेल्या भांडवलीकरणाच्या रकमेत फरक असल्यास, देय कराची रक्कम काढण्यासाठी अवमूल्यनाचादेखील या बदललेल्या रकमेनुसार पुन्हा हिशोब करण्यात यावा अशी नम्र विनंती आम्ही सन्माननीय आयोगास करतो.

### १.९.९ नॉन-टेरिफ इन्कम

(१) सन्माननीय आयोगाने फरक भरुन काढण्यासाठी रिझर्व्हजची पूर्ण जुळवणी केली आहे आणि टाटा पॉवरने पुनर्विचार करण्याबाबतच्या केलेल्या विनंतीवरील निर्णय प्रलंबित आहे, तसेच (२) पुनरावर्ती नसलेल्या खर्चाच्या बाबींचा अंदाज करता येत नाही, याचा विचार करुन नॉन-टेरिफ इन्कमची अंदाजित रक्कम रु.१२ कोटी इतकी येते.

### १.९.१० लोड कंट्रोल सेंटरसंदर्भातील खर्चाचे टाटा पॉवर-जी व डीदरम्यान विभाजन

आ.व.२००८-०९ च्या कामगिरीसंदर्भातील मुद्द्यांमधे लोड कंट्रोल सेंटरसंदर्भातील काही विशिष्ट खर्चाचे टाटा पॉवर-जी व डीदरम्यान विभाजन केले असल्याचे स्पष्ट केले आहे. टाटा पॉवर–टीच्या महसूल आवश्यकतेमधून ते खर्च वजा करण्यात आले आहेत. ही वजावट रक्कम रु.४ कोटी आहे.

### १.१० वार्षिक पारेषण चार्जेसचा सारांश

वरील विविध घटकांच्या अंदाजित खर्चांच्या आधारे, आ.व.२००९-१० करिता हिशोब करण्यात आलेल्या पारेषण व्यवसायासाठीच्या वार्षिक पारेषण चार्जेसचा सारांश खालीलप्रमाणे आहेः

**तक्ता १-१६: आ.व.२००९-१० – टाटा पॉवरटीचे वार्षिक पारेषण चार्जेस**

रु. कोटीमधे

| तपशील | आ.व.२००९-१० (बहुवर्षीय टेरिफ आदेशाद्वारे) आयोगाची मान्यता | आ.व.२००९-१० सुधारित अंदाज |
|---|---|---|
| **कामकाज व देखभाल खर्च** | ९१ | ११५ |
| - कर्मचारीसंबंधित खर्च | ४८ | ६६ |
| - व्यवस्थापन आणि सर्वसाधारण खर्च (ब्रँड इक्विटी परिणामासह नक्त) | २८ | ३३ |
| - दुरुस्ती आणि देखभाल खर्च | १५ | १५ |
| अवमूल्यन | ३३ | ३२ |
| दीर्घ मुदतीच्या कर्जावरील व्याज | १७ | ३६ |
| वर्किंग कॅपिटलवरील व्याज | ६ | ७ |
| इतर फायनान्स चार्जेस | - | - |
| स्टॅट्युटरी ॲप्रोप्रिएशन्स | ६ | ३ |
| आयकर | ३४ | ३७ |
| नियंत्रण करणे शक्य असलेल्या/नसलेल्या घटकांबाबत फायदा/तोट्यातील जुळवणी | - | - |
| मालमत्तेवरील / इक्विटी भांडवलावरील परतावा | ६९ | ७४ |
| वजा : नॉन – टेरिफ इन्कम | ९ | १२ |
| वजा : टाटा पॉवर–जी व टाटा पॉवर–डी दरम्यान एलसीसीसंबंधित खर्चाचे विभाजन | ० | ४ |
| **वार्षिक पारेषण चार्जेस** | **२४७** | **२८८** |

सन्माननीय आयोगाने वरील तपशील विचारात घेऊन त्यास मान्यता द्यावी अशी नम्र विनंती टाटा पॉवर-टी करत आहे.